**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ११/२०१९** **दिनांक ०५/०२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०१/२०१९ ते ०५/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून १०/०२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०१ | ३१/०१ | ०१/०२ | ०२/०२ | ०३/०२ | ०४/०२ | ०५/०२ | | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.० | ३१.६ | ३१.२ | ३१.२ | ३२.२ | ३२.४ | ३४.२ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३१ | ३० | ३० | ३१ |
| १२.० | ११.८ | १३.० | १३.० | १४.५ | १४.० | १४.५ | किमान तापमान (अं.से) | २० | १८ | १७ | १५ | १५ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | १ | ० | ० | ० |
| ९३ | ९५ | ९१ | ९० | ९१ | ८९ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६८ | ६५ | ७६ | ६० | ४९ |
| ६० | ६१ | ६६ | ६५ | ६१ | ६१ | ६६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४६ | ५२ | ४९ | ४० | ३० |
| ४.३ | ३.८ | ४.२ | ३.३ | ३.१ | ३.३ | ३.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | १८ | २२ | २१ | ८ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ०६ ते १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमान साधारण राहील. दिनांक ०६ ते १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेग ८ ते २२ कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भुईमुग | फुलोरा | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. त्याचप्रमाणे लागवडीनंतर ४५ - ६० दिवसांनी पिकावर रिकामे पिंप फिरवावे जेणेकरुन जमिनीत घुसणाऱ्या आऱ्यांची आणि शेंगाची संख्या वाढण्यास मदत होईल. |
| कडधान्ये पिके | शेंगा अवस्था | • काढणीस तयार झालेल्या कडधान्य पिकांची काढणी सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. |
| आंबा | मोहोर व फलधारणा अवस्था | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• सध्या आंबा पिकामध्ये मोहोर फुटण्याची व वाटाण्याच्या आकाराची फळे येण्याची अवस्था असून ढगाळ वातावरण संभवत असल्याने त्यावर तुडतुड्याचा आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम + करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• नवीन लागवडीतील आंब्याच्या कलमांना गवताचे आच्छादन करून नियमित पाणी दयावे. |
| काजू | बी अवस्था | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• काजूमध्ये सध्या मोहोर व बी अवस्था असून त्यावर फुलकिडीचा व ढेकण्या किडीचा (टी मॉस्कीटो बग) प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. कीटकनाशकाची प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• नवीन काजू लागवडीतील कलमांना गवताचे आच्छादन करून नियमित पाणी दयावे. |
| नारळ | - | • नारळाच्या पाच वर्षावरील माडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश असा खताचा तिसरा हप्ता दयावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. |
| सुपारी | - | • सुपारी बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• सुपारीवर मुंग्यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २५ टक्के डब्लू. पी कीटकनाशकाची सुपारीच्या खोडावर धुरळणी करावी. |
| मसाले पिके | फळपक्वता | • काळीमिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीची काढणी करावी व दुसऱ्या दिवशी मिरीचे दाणे घोसापासून वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिटे बुडवावेत व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फळधारणा | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• काढणीस तयार झालेल्या भाजीपाला पिकांची काढणी करावी<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना तापसरी किंवा गोचीडाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास पशुवैद्यकच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना कराव्या.<br>• रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**